स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Synopsis of the Thesis Entitled

: शिर्षक :

"डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी तत्त्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्य विद्याशाखेतील तत्वज्ञान विषयात पीएचडी पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा गोषवारा

-: संशोधक :-

चव्हाण श्रावंती श्रीराम

गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी,

-: मार्गदर्शक :-

डॉ. कुलकर्णी स्वाती नागोराव

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,

शारदा महाविद्यालय, परभणी

सप्टेंबर - 2023

“डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी तत्त्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास”

प्रस्तावना :

आज मानवाने आपल्या बौद्धिक शक्तीच्या बळावर प्रगतीचे नवनवीन क्षेत्र काबीज केली आहेत. जंगलात भटकंती करणारा माणूस सुरुवातीला शेती करू लागला. नवनवीन कल्पकतेतून हळूहळू स्वतःचा विकास करू लागला. तोच परिवर्तनवादी सृजनशील माणूस वर्तमान काळातील विकसित मानवाचा प्रेरणास्त्रोत आहे. प्राचीन काळात माणसा माणसात चढाओढ होत होती, स्वतःचे सामर्थ्य दाखवण्यासाठी काही स्पर्धा होत होत्या. परंतु त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव नव्हता. त्यांच्या गरजा मर्यादित स्वरूपाच्या असल्याने कधीही अत्याचार व अन्यायकारक व्यवस्था पहावयास मिळत नाही. मानव हा मुळात भावनाशील सहकार्यवृत्तीचा व प्रेमळवृत्तीचा आहे काळाच्या ओघात मानवांमध्ये अनेक प्रकारचे भेदाभेद निर्माण झाले. माणसा माणसात वैर निर्माण झाले माणसाचे माणूसपण हरवत चाललेले दिसून येते. हे इतिहासामध्ये घडणाऱ्या विविध घटनांमधून पहावयास मिळते. विषमता, भेदभाव अस्पृश्यता जोपासणाऱ्या विचारसरणीला नष्ट करून मानवतावादी समाजाची उभारणी करण्याचे महान कार्य अनेक मानवतावादी तत्त्वज्ञ, विचारवंत यांनी केले. जगातील पहिला मानवतावादी तत्त्वचिंतक म्हणून महात्मा गौतम बुद्ध यांनी समतावादी विचारातून मानवाला नवे आत्मभान दिले. धम्माने मानवाला नव्या वैचारिक क्रांतीची ऊर्जा प्रदान केली. काळाच्या ओघात विविध धर्माचा उदय झाला. समाजातील विषमते विरुद्ध आवाज उठवला गेला. मानवी समाजात नवचैतन्य निर्माण करण्याचे कार्य केले. त्यात प्रामुख्याने गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, गुरुनानक, हजरत मोहम्मद, पैगंबर, संत कबीर, संत तुकाराम महाराज इत्यादींनी समाजातील वाईट चालीरीती, रूढी, परंपरावर जोरदार हल्ला चढवला. संत कबीरांचे काव्य हे मानव मुक्तीसाठी होते. माणसाला कायमचे गुलाम करू पाहणाऱ्या समाज व्यवस्थेविरुद्ध कबीराचे बंड होते.

अर्थात जगामध्ये आजपर्यंत अनेक मानवतावादाचे पुरस्कर्ते होऊन गेले, परंतु मानवी समाजातील विषमता व शोषण थांबले नाही. अनेक मानवतावादी विचारवंत धर्माची भिंत तोडू शकले नाहीत. धर्माच्या नावाखाली माणसा माणसात भेदभाव केले गेले. गौतम बुद्धांनी जगाला समतेचा संदेश दिला मानवतावादी विचार दिले परंतु समाजाला काळाच्या ओघात त्याचा विसर पडला. याचा परिणाम म्हणून जगात विषमता वाढली. भारतासारख्या महान राष्ट्रातही अन्यायकारी व विषमतावादी समाजव्यवस्था निर्माण झाली. परंतु भारताच्या मातीत महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज परिवर्तनाची नवी दिशा समाजाला देऊन नवी क्रांती ज्योत पेटवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ज्ञानाच्या बळावर जातीय विषमते

विरुद्ध महाआंदोलन केले. नववंशशास्त्राचे अध्ययन करून मानव मुक्तीचा लढा दिला. माणसाच्या माणूसपणासाठी अविरत संघर्ष केला. त्यातूनच नवा मानवतावाद उदयास आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अखंड मानव जातीचे उद्धारक होते त्यांनी स्वातंत्र्य,समता, बंधुता या सामाजिक मूल्यांवर आधारित मानवी समाजाची स्थापना करण्यासाठी प्रयत्न केला. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अस्पृश्य दलित समाजाचे उद्धारक, दलितांची कैवारी असे संबोधले जाऊन त्यांची प्रतिमा संकुचित करण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार व मानवतेचे उद्धारक आहेत, हे विसरून चालणार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य महार जातीमध्ये जन्माला आले, त्यांना गावात वस्तीमध्ये येण्याचा अधिकार नव्हता. चातुर्वर्ण व्यवस्थेत सर्वात खालच्या वर्गात जन्म घेऊन सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणामुळे जागतिक स्तरावर नावलौकिक मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. जातीव्यवस्थेचा पगडा असलेल्या हिंदू धर्मात ज्या विषमतेचे चटके लाखो लोक सहन करत होते त्यापैकी बाबासाहेब हे एक होते. ज्या जातीय भेदभावामुळे, जातीच्या उतरंडीमुळे हिंदू धर्मातील माणसाला माणसापासून दूर केले होते विषमतेची भावना निर्माण करून मानवाने मानवाचे अधिकार हिरावून घेतले होते. माणसाला माणुसकीने वागवले जात नव्हते, जातीभेदाने हिंदू धर्माला ग्रासले होते. या जातीभेदाचा मुळासकट नायनाट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी विचार संजीवनी ठरले आहेत. हिंदू समाजातील जातीवादाची उतरंड तोडून जर सर्वांना एका रांगेत आणून बसवले तर सामूहिक विकास होऊन देशाच्या प्रगतीसाठी सहाय्यक ठरेल. अशी सर्वसमावेशक मानवतावादी संकल्पना त्यांची होती. एक जात दुसऱ्या जातीला कनिष्ठ समजून स्वतः कसे श्रेष्ठ आहेत असे भासवुन जातीचे अस्तित्व टिकवण्यासाठी धडपडत असतात. जातीच्या बंधनामुळे सामाजिक मुद्द्यावर एकत्र येऊ शकत नाहीत. हिंदू समाज अजूनही खान पान, रूढी, परंपरा, पूजा, अर्चा सारखीच करत असले तरी सर्व जाती सारख्या कधीच होणार नाहीत. याची जाणीव त्यांना होती. म्हणून जोपर्यंत माणुसकीच्या भावनेने माणूस एक होणार नाही तोपर्यंत विषमता नष्ट होणार नाही असे उदात्त मानवतावादी विचार बाबासाहेबांनी जगाला दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एकाच जातीसाठी किंवा धर्मासाठी आपले विचार व कार्य समर्पित केले नाहीत. तर ते सर्व मानवजातीसाठी होते. येणाऱ्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी विचार हे तळागाळातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.

उन्नती हा मानवी समाजाचा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे मध्ययुगाच्या अंधकारमय विश्वातून प्रबोधन काळाची सुरुवात झाली. त्यातून मानवतावादी चळवळीचा प्रारंभ झाला. पुरानमतवादी विचारांच्या बंधनातून मुक्त होऊन मानवी जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी समाजाला प्राप्त झाली. सृजनशीलता व नववैज्ञानिक दृष्टिकोनामुळे मानवाला नवीन विचारसापेक्षता प्रदान केली. प्लेटो ॲरिस्टॉटल यांनी मानवी समाजासाठी

उपयुक्त व दिशादर्शक अशी ग्रंथरचना केली. त्या ग्रंथातून एक नवीन तत्त्वज्ञान जगासमोर आले. प्रोटागोरस हर्डर यासारख्या तत्त्वचिंतकांनी मानवतावादावर चिंतन केले.

जगातील सर्व माणसाचा भौतिक नैतिक व आध्यात्मिक विकास करणाऱ्या विचारसरणीला मानवतावाद असे म्हणतात. मानव हाच तत्व विश्वाच्या विचाराचा केंद्रबिंदू आहे. असे मानवतावादाचे प्रतिपादन आहे. अर्थात मानवाने मानवासारखे वर्तन करणे म्हणजे मानवतावाद होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संबंध मानवजातीच्या सर्वांगीण विकासासाठी व आत्मिक कल्याणसाठी आयुष्यभर कष्ट घेतले संघर्ष केला. महाड येथील चवदार तळ्याच्या आंदोलनावेळी ठराव मांडताना बाबासाहेब म्हणतात, " सर्व मानव जन्मतः समान दर्जाचे आहेत व ती मरेपर्यंत समान दर्जाचीच राहतील. लोकोपयोगीत्वाच्या दृष्टीनेच त्यांच्या दर्जात फरक पडू शकेल. परंतु इतर वेळी त्यांचा समान दर्जा तसाच कायम राहिला पाहिजे म्हणून कारभारात आणि सार्वजनिक व्यवहारात समानतेच्या तत्वाला बाधा येईल अशा कोणत्याही धोरणाला व विचारांना थारा मिळू नये असे या सभेचे मत आहे. " हा ठराव म्हणजे बाबासाहेबांच्या मानवतावादी विचारांची क्रांतिकारी सुरुवात होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सर्व मानव जातीचे कल्याण व्हावे असे वाटत होते. त्यांच्यावर अनेक वाईट प्रसंग आले, तरी त्यांनी मानवी कल्याणाची प्रयत्न सोडले नाहीत. जगातील सर्व मानवाला त्यांचे हक्क मिळावेत यासाठी संघर्ष केला. कोणताही व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहणार नाही. तसेच त्यांचा सामाजिक आर्थिक व राजकीय विकास व्हावा याची तरतूद संविधानात करून ठेवली. जागतिक पातळीवर आज आंबेडकरांच्या मानवतावादी विचारांची आवश्यकता आहे. शोषित,वंचित, पीडित, कष्टकरी, शेतकरी, कामगार,विद्यार्थी, स्त्री यांना जगण्यासाठी प्रेरणा देणारा, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारा,मूल्यसापेक्ष समानतेचा नवा क्रांतीसुर्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मानवतावाद भारताला व जगाला नव्या परिवर्तनवादी विचारांकडे घेऊन जाणारा दीपस्तंभ आहे. आज बाबासाहेबांच्या मानवतावादी विचाराशिवाय दुसरा कोणताही विचार देशाला एकसंध ठेवू शकत नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी तत्त्वज्ञान समजून घेणे ही काळाची गरज आहे.

विषय निवडीची भूमिका :

संशोधन विषयाची निवड करताना अध्ययनाचे काही पैलू निश्चित केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाचे सखोल अध्ययन करणे व त्यांच्या मानवतावादी विचारांची उपयुक्तता आजच्या संदर्भात स्पष्ट करणे हा मुख्य हेतू आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक नैतिक राजकीय विचार व मानवतावादी तत्त्वज्ञान निश्चितच समाजातील तरुण पिढीला उपयुक्त ठरणारे असल्यामुळे या विषयाची निवड केली.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research) :

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाची सविस्तर चर्चा करणे.

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नैतिक विचारांचे स्वरूप स्पष्ट करणे.

3) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाची आवश्यकता अधोरेखित करणे.

4) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी विचारा मागील तत्त्वज्ञान नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे.

5) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांवर प्रकाश टाकणे.

6) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाची वर्तमान काळातील महत्त्व स्पष्ट करणे.

7) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाची माहिती घेणे.

8) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्याचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहितके (Research Hypothesis) :

1) वर्तमान परिस्थितीस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी तत्त्वज्ञान उपयुक्त ठरणारे आहे.

2) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी तत्त्वज्ञान हे सामाजिक सलोखा व समानता प्रस्थापित करण्यात सहाय्यक ठरतात.

3) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विवेकी दृष्टीकोणातून निर्माण केलेले मानवतावादी तत्त्वज्ञान हे शोषण विरहीत सामाज निर्मिती करण्यास पोषक आहे.

संशोधनाचे महत्त्व (Importance of Research) :

संशोधनाचे महत्त्व खालील प्रमाणे

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी विचारांचा स्वीकार केल्यास वर्तमान काळातील सर्व स्तरातील समस्यांचे निराकरण करण्यास मदत होईल.

2) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुता ही सामाजिक मूल्य अधिक दृढ होण्यास मदत होईल.

3) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रगल्भ बौद्धिक कौशल्याची तसेच त्यांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाची माहिती नवीन पिढीला होईल.

4) समाजातील उच्च नीच अशा सर्व स्तरातील व्यक्तींना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी विचार समजल्यावर समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यास मदत होईल.

5) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानामुळे समाजातील वंचित घटकांना समानतेची वागणूक मिळेल तसेच त्यांना विकासाच्या प्रवाहात आणता येईल.

6) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मानवतेचे समतेचे पुरस्कर्ते होते.त्यांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानामुळे त्यांच्या संमतेचा दृष्टिकोन समजून घेता येईल.

7) सामाजिक परिवर्तनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी तत्त्वज्ञान आजच्या संदर्भात उपयोगी ठरू शकते.

संशोधन पद्धती (Research Methodology) :

कोणत्याही विषयातील संशोधन करीत असताना ते संशोधन शास्त्रशुद्ध व्हावे अचूक निष्कर्ष निघावेत यासाठी वेगवेगळ्या संशोधन पद्धती आहेत.प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने विश्लेषणाची पद्धती वापरली जाणार आहे. प्रस्तुत प्रबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाचा विचार केला असल्याने संशोधनासाठी प्रामुख्याने विश्लेषणाची पद्धती वापरली जाणार आहे. प्रस्तुत प्रबंधाची सुसंगत वैचारिक लेखनाद्वारे मांडणी करणे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी तत्त्वज्ञानाची विश्लेषण करून संदर्भ ग्रंथांमधून संबंधित विषयावरील विचार व मते यांची आवश्यक तेथे उपयोग करून त्यावर साधक बाधक विचार केला जाईल. अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी तत्त्वज्ञानावर वैचारिक संशोधन करून निश्चित असे निष्कर्ष काढले जातील.

संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष प्राथमिक व दुय्यम श्रोतातून मिळालेल्या माहितीवर आधारित आहेत.

प्रकरणांची रूपरेषा :

प्रस्तुत शोध प्रबंधाची विभागणी एकूण सहा प्रकरणात करण्यात आली आहे. त्या प्रकरणांची रचना पुढीलप्रमाणे

प्रकरण पहिले - प्रस्तावना व संशोधन पध्दती

प्रकरण पहिले हे संशोधन आराखड्याशी संबंधित असून या प्रकरणात प्रस्तावना, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाचे उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधन पद्धती यांची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण दुसरे - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवन वृत्तांत

प्रस्तुत प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची कौटुंबिक पार्श्वभूमी, शिक्षण पूर्ण करताना त्यांना आलेल्या अडचणी, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पडलेला थोर व्यक्ती, शिक्षक यांचा प्रभाव इत्यादीचे विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नैतिक विचार

प्रस्तुत प्रकरणात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या नैतिक विचारांची चर्चा करण्यात येणार आहे. प्रत्येक व्यक्ती जो त्यांचा अनुयायी आहे त्याला बाबासाहेबांच्या नैतिक तत्त्वज्ञानाचे ज्ञान होणे आवश्यक आहे. तत्त्वज्ञानाची ज्ञान झाल्याशिवाय व्यक्तीला नैतिक निर्णय घेता येणार नाहीत. व्यक्तीच्या प्रगतीसाठी नैतिकता असणे आवश्यक आहे. म्हणून बाबासाहेबांच्या नैतिक विचाराचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार

प्रस्तुत प्रकरणात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांचे अध्ययन करण्यात येणार आहे तसेच अन्याय, विषमता,शोषणावर आधारित वर्णव्यवस्थेचा त्याग करून बाबासाहेबांनी समतेवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी जो संघर्ष केला त्याचे विश्लेषण या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी विचार

प्रस्तुत प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी विचारांचे सविस्तर विश्लेषण करण्यात येणार आहे तसेच त्यांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाची वर्तमान काळात आवश्यकता स्पष्ट करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे - निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात आत्तापर्यंत केलेल्या अभ्यासाचा आढावा घेऊन सिद्धांत कल्पना/ गृहीत कृत्य आणि संशोधनाच्या उद्दिष्टांना अनुसरून निष्कर्षाची मांडणी करण्यात येणार आहे.

संदर्भ सूची :

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची सामाजिक,राजकीय, धार्मिक चळवळ- साळवे मधुकर

2) बुद्ध आणि त्याचा धम्म - डॉ. बी.आर.आंबेडकर

3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - धनंजय कीर

4)डॉ. भीमराव रामजी आंबेडकर - खंड 4- भगवानराव खेरमोडे

5)डॉ. आंबेडकर चिंतन- केशव मेश्राम

6) एस. राधाकृष्णन - इंडियन फिलॉसॉफी खेड - 1ला

7) शूद्र पूर्वी कोण होते? डॉ.बी. आर. आंबेडकर

8) डॉ. आंबेडकर लाईफ अँड मिशन - धनंजय कीर

9) शुद्राज इन एशियंट इंडिया - आर.एस. शर्मा

10) भारतीय समाज एवं विचारधारा - डॉ. डी.आर. जाटव

11) बाबासाहब का जीवन संघर्ष - चंद्रिका प्रसाद जिज्ञासू

12) डॉ. आंबेडकर का राजनीति दर्शन- डॉ.डी. आर.जाटव

13) डॉ.आंबेडकर का नैतिक दर्शन- डॉ.डी. आर.जाटव

14) डॉ. आंबेडकर का समाज दर्शन - अनिलेश कुमार सिंह

15) डॉ.भीमराव आंबेडकर जीवन और कार्य - एन. एल.शहारे

-: संशोधक :-

चव्हाण श्रावंती श्रीराम

गंगाखेड जि. परभणी,

-: मार्गदर्शक :-

डॉ. कुलकर्णी स्वाती नागोराव

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,

शारदा महाविद्यालय, परभणी